# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. २८/०३/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक २८/०३/२००६ रोजी सभा सुचना क्र. २९ दि. २२/०३/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**<u>उपस्थित सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ९) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १०) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ११) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १२) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १३) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १४) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

**<u>गैरहजर सदस्य</u>**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| २) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असेलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करतो आणि सभा सुरु करावी अशी मी सचिवांना विनंती करतो.

(सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, सभेला सुरुवात होण्यापूर्वी मी बोलू इच्छितो. हा अतिशय महत्वाचा विषय आहे. आज चेण्याची शाळा पाडून दोन महिने झालेले आहेत. आता पाऊस तोंडावर आलेला आहे. मुलांना बसण्याची व्यवस्था आहे तशीच आहे. किर्ती वोहरा कॉन्ट्रॅक्टरला दोन महिन्यापूर्वी टेन्डर दिलेले आहे. परंतु, त्या कॉन्ट्रॅक्टरने अजुनपर्यंत काम सुरु केलेले नाही. उद्या पाऊस पडल्यावर महापालिका त्या मुलांची बसण्याची व्यवस्था करेल का? याचे मला उत्तर द्यावे किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाने याबाबत माहिती द्यावी.

**गजानन भोईर :-**

या कॉन्ट्रॅक्टरला किती टाईम लिमिट दिलेले आहे किंवा या कॉन्ट्रॅक्टरला त्याचे काम कधीपर्यंत पूर्ण करायला सांगितलेले आहे त्याची माहिती द्यावी.

**केशव घरत :-**

आज चेण्याची शाळा पाडून दोन महिने झालेले आहेत. परंतु, अजुनपर्यंत तिथे काहीही काम झालेले नाही.

**जयंत पाटील :-**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांना बोलवा.

**गजानन भोईर :-**

मा. सभापती साहेब, त्या कॉन्ट्रॅक्टरची मुदत किती आहे? ते तुम्ही विचारा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सिटी इंजिनियर साहेबांनी याबाबत खुलासा करावा.

**केशव घरत :-**

जर अशा कॉन्ट्रॅक्टरची कामे करण्याची कुवत नसेल तर त्यांना महानगरपालिका कशासाठी कामे देतात? तुम्ही किर्ती वोहरा कॉन्ट्रॅक्टरला कामे का देता? जर किर्ती वोहरा कॉन्ट्रॅक्टरकडून कामे होत नसतील तर त्यांना कामे द्यायला नकोत.

**दिपक खांबित :-**

आजच किर्ती व्होरा कन्स्ट्रक्शनचे साईटला मटेरियल पडलेले आहे. म्हणजे सिमेंट आणि मटेरियल साईटला टाकलेले आहे. आपण त्या कॉन्ट्रॅक्टरला दोन दिवसात काम चालू करण्याची नोटिस दोन दिवसापूर्वी दिलेली होती. त्या कॉन्ट्रॅक्टरने त्याप्रमाणे साईटवर मटेरियल टाकलेले आहे.

**केशव घरत :-**

साहेब, त्या कॉन्ट्रॅक्टरने याच्यापूर्वीसुध्दा साईटवर टाकलेले मटेरियल उचलून आणलेले होते.

**दिपक खांबित :-**

त्या कॉन्ट्रॅक्टरने साईटवर सिमेंट आणि मटेरियल टाकलेले आहे. जर त्या कॉन्ट्रॅक्टरने दोन-चार दिवस किंवा पंधरा दिवसात त्याचे कामसुरु केले नाही तर आपण त्यांचे कॉन्ट्रॅक्ट रद्द करु.

**केशव घरत :-**

आता असेसुध्दा पंधरा दिवस निघून जातील. त्या कॉन्ट्रॅक्टरने दोन माणसे लावून काम सुरु केलेले आहे.

**दिपक खांबित :-**

कॉन्ट्रॅक्ट थांबवायचीसुध्दा प्रोसिजर आहे.

**केशव घरत :-**

परंतु, त्या प्रोसिजरचा काय अवधी आहे? म्हणजेच त्या कॉन्ट्रॅक्टरला कॉन्ट्रॅक्ट दिल्यानंतर त्याचा किती अवधी आहे? तो अवधी आम्हाला सांगा.

**दिपक खांबित :-**

आपण त्या कॉन्ट्रॅक्टरला एक वर्षाचा अवधी दिलेला आहे. आम्हाला काळजी नाही अशाप्रकारे आम्हाला तुम्ही आम्हाला का विचारता?

**केशव घरत :-**

तुम्हाला काळजी आहे हे बरोबर आहे. परंतु, आम्हाला तिकडची लोक विचारत असतात. श्री. खांबित साहेब, तुम्ही ऑफिसमध्ये असता. परंतु, तुम्ही पुढे काय करणार आहात? असे आम्हाला तेथील नागरिक विचारतात.

**दिपक खांबित :-**

परंतु, ही जबाबदारी आमचीसुध्दा आहे.

**मिलन पाटील :-**

हा विद्यार्थ्यांचा प्रश्न असल्यामुळे सर्व अधिका-यांनी हे काम जबाबदारीने घ्यावे.

**दिपक खांबित :-**

साहेब, आम्ही काय प्रयत्न करतो ते तुम्हालासुध्दा माहित आहे.

**मोहन पाटील :-**

जर ठेकेदाराने शाळेचे बांधकाम वेळेवर केले नाही तर प्रशासनाला त्या विद्यार्थ्यांसाठी व्यवस्था करावी लागेल.

**केशव घरत :-**

प्रशासन कुठे व्यवस्था करणार?

**मोहन पाटील :-**

प्रशासनाला व्यवस्था करावीच लागेल. कुठे करणार म्हणजे काय?

**दिपक खांबित :-**

शाळेतील विद्यार्थ्यांची व्यवस्था करावीच लागेल.

**केशव घरत :-**

जर शाळेचे बांधकाम पूर्ण झाले नाही तर प्रशासन विद्यार्थ्यांच्या बसण्याची व्यवस्था करेल असे तुम्ही मला एक लेखी पत्र द्या.

**जयंत पाटील :-**

मी शाळेसंबंधी बोलू इच्छितो. त्याहीपेक्षा मला तुमच्या कानावर एक माहिती घालायची आहे की मी काल बंदरवाडीच्या प्रभाग क्र. ३ च्या कार्यालयात गेलेलो होतो. नक्की आपले कार्यालय शाळेत आहे की शाळा

आपल्या कार्यालयात आहे हा एक चर्चेचा विषय आहे. आपले तिकडचे महत्वाचे क्लार्क एका रुममध्ये बसलेले होते. तिथे आजुबाजुला लहान मुले खेळत होती, तिथे खेळणी होती, फावडे होते, घमेले होते. हा काय प्रकार आहे? आपण रु. २८० करोडचे बजेट सादर करतो आणि आपल्या प्रभाग समितीची अशी हालत असणे योग्य नाही. त्या ठिकाणी कर्मचा-यांना बसायला जागासुध्दा नाही.

**गजानन भोईर :-**

एका वर्गात शाळासुध्दा चालते आणि तिथे क्लार्कसुध्दा त्यांचे काम करतात.

**जयंत पाटील :-**

तुम्ही तिथे प्रत्यक्ष जाऊन बघा. त्या क्लार्क श्री. विजय पाटील यांच्या मिसेस आहेत. त्या कोणाच्या मिसेस आहेत हा मुद्दा नाही. आजुबाजुला मुले खेळत असतात आणि आपला कारभार एवढा मोठा असून कोणाचेही कॉन्सन्ट्रेशन नाही ही अतिशय दुःखाची गोष्ट आहे.

**मिलन पाटील :-**

साहेब, या ठिकाणी शिक्षणाचा मुद्दा उपस्थित झालेला असताना शिक्षण अधिकारी उपस्थित नाहीत.

**प्रेमनाथ पाटील :-**

शिक्षण अधिकारी कुठे आहे?

**गजानन भोईर :-**

शिक्षण अधिकारी या सभेला उपस्थित नाहीत आणि प्रभाग समितीच्या मिटींगमध्येसुध्दा उपस्थित नव्हते.

**मोहन पाटील :-**

परंतु, आता शिक्षणाचा विषय नाही.

**मिलन पाटील :-**

शिक्षण अधिकारी मिटींगला हजर राहत नाही. शिक्षण अधिका-याला मिटींगमध्ये हजर राहणे बंधनकारक नाही का?

**जयंत पाटील :-**

आपण या विषयावर योग्य तो निर्णय घेणार आहोत. श्री. खांबित साहेब, तुम्ही या विषयावर काय निर्णय घेणार आहात? ते सांगा.

**ज्युडी डिसोझा :-**

शाळेचा विषय कधीही निघतो. त्यामुळे शिक्षण अधिका-यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**मा. सभापती :-**

आपल्याला यासाठी पर्यायी जागेची व्यवस्था करता येते का? ते बघावे लागेल.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, पर्यायी जागा बघावी लागेल हे काही उत्तर नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आता शाळा क्र.६ चे बांधकाम चालू आहे.

**मा. सभापती :-**

प्रभाग समिती क्र.३ मध्ये सभापती बसलेले आहेत. त्यांना काही कळत नाही का?

**जयंत पाटील :-**

मग तुम्ही शाळेचा विषय कशाला मांडता?

**गजानन भोईर :-**

प्रभाग समितीच्या मिटींगमध्ये प्रभाग समितीच्या सभापतींना उत्तर देऊ दे.

**मिलन पाटील :-**

मा. सभापती साहेब, आम्ही भाईंदर सेकंडरी स्कुलची बिल्डींग २० तारखेनंतर तोडायला घेणार आहोत. आम्हीसुध्दा मागणी केलेली आहे. मी सहा महिन्यापूर्वी तीन-तीन वर्ग देण्याची मागणी केलेली होती. परंतु, शिक्षण अधिकारी अजुनपर्यंत होकार देत नाहीत. आम्ही हे तीन वर्ग नाममात्र भाड्याने मागत आहोत. आम्हाला हे तीन वर्ग दोन तासाकरिता भाड्याने हवे आहेत. आम्ही हे वर्ग कायमचे भाड्याने मागत नाही. त्याकरितासुध्दा शिक्षण अधिकारी जवाब देत नाहीत. आपली शाळा तोडली तेव्हा आम्ही आमचे वर्ग भाड्याने दिलेले होते. भाईंदर सेकंडरी शाळेने त्यावेळेला महानगरपालिकेला वर्ग भाड्याने दिलेले होते. आम्ही आमच्या मुलांची सोय करु असे सांगितले होते. अजुनसुध्दा शिक्षण अधिकारी नाही बोलतोय. म्हणजे आपल्याला या शिक्षण अधिका-यांना घरची शाळा द्यायची आहे का? आम्ही हे वर्ग मुलांकरिता मागत आहोत.

**मा. सभापती :-**

आपण या सर्व गोष्टींचा विचार करु.

**रतन पाटील :-**

तुम्ही पुढच्या सभेमध्ये शिक्षण अधिका-यांना बोलवा.

**केशव घरत :-**

मा. सभापती महोदय, आमचासुध्दा तसाच प्रश्न आहे. घोडबंदरची नं. ९ ची शाळा बांधली. तेव्हा आम्ही आमच्या शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या बसण्याची सोय केलेली होती. तुम्ही आम्हाला दोन वर्ग बंद करायला सांगता. मग आम्हाला जुन महिन्यापर्यंत वर्ग मिळणार आहेत की नाही ते सांगा.

**सुर्यकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, आमच्या मिरा रोडच्या कार्यालयात टेन्डर वगैरे सर्व काही झालेले आहे. ते कार्यालय अजुनपर्यंत तोडलेले नाही आणि त्या कार्यालयाचे काम सुरु झालेले नाही.

**मिलन पाटील :-**

साहेब, तुम्ही शिक्षण अधिकाऱ्यांना बोलवा.

**रतन पाटील :-**

तुम्ही उद्या स्थायी समितीला शिक्षण अधिकाऱ्यांना बोलवू शकता.

**केशव घरत :-**

सगळ्या अधिकाऱ्यांना बोलवा.

**रतन पाटील :-**

ज्यांना ॲन्टी करप्शनने पकडलेले आहे. तुम्ही त्यांना ठेवता हे योग्य नाही.

**मिलन पाटील :-**

तुम्ही असे बोलता मग हे अधिकारी फालतु आहेत का? मग त्यांनासुध्दा घरी पाठवा आणि ज्यांचा विषय आहे त्यांना बोलवा.

**सुर्यकांत भोईर :-**

उद्या शिक्षण अधिकाऱ्यांनासुध्दा बोलवा. शिक्षण अधिकाऱ्यांकडून माहिती मिळेल.

**रतन पाटील :-**

शिक्षण अधिकारी बोलतच नाहीत.

**मोहन पाटील :-**

शिक्षण अधिकाऱ्यांना बोलावतो.

**जयंत पाटील :-**

वर्तमानपत्रामध्ये शिक्षण अधिकाऱ्याची बातमी आलेली आहे. त्याच्यावर माहिती गोळा करायची आहे.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदय शिक्षण अधिकाऱ्यांना बोलावणार आहेत.

**सुर्यकांत भोईर :-**

शिक्षण अधिकाऱ्यांना काही पडलेले आहे की नाही.

**रतन पाटील :-**

ह्या शिक्षण अधिकाऱ्यांना पाठवा आणि दुसरा शिक्षण अधिकारी येऊ द्या. शिक्षण अधिकाऱ्यांना काहीही पडलेले नाही.

**मिलन पाटील :-**

तुम्ही या सभेत शिक्षण अधिकाऱ्यांना बोलवा.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील, तुम्ही शिक्षण अधिकाऱ्याबाबतचा ठराव करा आणि शिक्षण अधिकाऱ्यांना परत पाठवा.

**मोहन पाटील :-**

तुम्ही शिक्षण अधिकाऱ्यांचा ठराव का मांडत आहात? शिक्षण मंडळ स्थापन झालेले आहे. शिक्षण मंडळात दोन सदस्य येणे बाकी आहेत. त्यांचे रेकमन्डेशन झालेले आहे. त्याबाबत सी.एम.कडून पत्रसुध्दा निघालेले आहे. ते आल्यानंतर दुसरे शिक्षण अधिकारी येतील.

**रतन पाटील :-**

याचा अर्थ हे शिक्षण अधिकारी जातील का?

**मोहन पाटील :-**

हे शिक्षण अधिकारी जातीलच. आपण शिक्षण अधिकाऱ्यांना पाठवू या.

(सचिवांनी प्रकरण क्र. २२९ चे वाचन केले.)

**जयंत पाटील :-**

या विषयाचा गोषवारा दिलेला नाही.

**मोहन पाटील :-**

मा. सभापती महोदयांनी हा सुमोठा विषय घेतलेला आहे.

**जयंत पाटील :-**

हा विषय सुमोठा घेतला तरी आम्हाला त्याची माहिती मिळायला नको का? उपहारगृहाचे प्रकरण शासनाकडे का पाठविले गेले? ते सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

परंतु, उपहारगृहाचा विषय शासनाकडे पाठविला की नाही ते सांगा.

**गजानन भोईर :-**

जर उपहारगृहाचा विषय शासनाकडे पाठविला असेल तर त्याचे पत्र किंवा उत्तर काय आलेले आहे? ते सांगा.

**सुर्यकांत भोईर :-**

उपहारगृहाचा विषय पाठविला की नाही ते समजायला नको का?

**जयंत पाटील :-**

तुम्ही दोन-चार महिन्यानंतर या विषयावर कशी चर्चा कराल? ते सांगा. आम्ही पुढच्या वेळेला विषय घ्यायला सांगतो.

**गजानन भोईर :-**

उपहारगृहाचा विषय लोकसभेमध्ये पाठविला आहे की आणखी कुठे पाठविला आहे? ते सांगा.

**मिलन पाटील :-**

याचा अर्थ प्रशासन एवढे फॉर्म नाही. आमचा प्रशासनाच्या या गोष्टीला विरोध आहे.

**कैलासबेन जानी :-**

जर उपहारगृहाच्या विषयावर चर्चा चालली होती तर तो विषय परत येत नाही.

**रतन पाटील :-**

प्रशासन फॉर्म नाही.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, आपल्याला नविन ठेका घ्यायचा आहे का?

**मिलन पाटील :-**

साहेब, तुम्ही गोषवारा का दिलेला नाही? त्याबाबत सांगा.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, नगरपालिकेचे जे नुकसान झालेले आहे त्याची वसुली ज्यांनी ठेका घेतलेला आहे त्यांच्याकडून करावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

जे नुकसान झालेले आहे त्याची वसुली अधिकारी करतील.

**मोहन पाटील :-**

याच्यापुढील अनेक सभांमध्ये काम करण्यासाठी सांगण्यात येते की जेव्हा मा. सभापती साहेब सुमोठे विषय घेतात आणि जेव्हा रुलिंग होते. ते रुलिंग झाल्यानंतर संबंधित खात्याच्या अधिका-याने त्या मा. सभापती महोदयांना भेटणे आवश्यक आहे आम्ही असे-असे रुलिंग दिलेले आहे. त्यामुळे हा विषय घेण्यात येणार असे कळविणेसुध्दा आवश्यक आहे. हा सुमोठा विषय असल्यामुळे तुम्हीच तो गोषवारा देणे आवश्यक आहे. जेव्हा विषय विषयपत्रिकेवर येतो तेव्हा डी.एम.सी. साहेबांनी त्या विषयाचा गोषवारा चार ओळींमध्ये दिला पाहिजे अशी तुम्ही पध्दत सुरु करा. आताच्या विषयाला गोषवारा तयार झाला नाही हा एक वेगळा विषय आहे. परंतु, प्रशासनाच्या प्रत्येक विषयाला गोषवारा येतो. जेव्हा सदस्य ही ही एक आवश्यक बाब असल्याचे सांगतात तेव्हा आपण समोठे विषय घेतो. तुम्ही अशा सुमोठ्या विषयाचा गोषवारा चार ओळींमध्ये देणे आवश्यक आहे. मा. सभापती महोदय तुम्ही प्रशासनाला गोषवारा देण्याबाबत सांगा.

**सुर्यकांत भोईर :-**

परंतु, हा कॅन्टीनचा विषय आलेला आहे त्याचे काय?

**रतन पाटील :-**

या विषयाचे काय करायचे? मा. सभापती साहेब, आपण हा विषय घेऊ शकतो का? मा. आयुक्त साहेबांनी हे प्रकरण राज्य शासनाकडे पाठविलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

हे प्रकरण राज्य शासनाकडे पाठविलेले आहे का? ते प्रथम बघा.

**रतन पाटील :-**

त्या दिवशी सभेमध्ये विषय आला त्याच्यानंतर मी मा. आयुक्त साहेबांना भेटलो होतो. हे प्रकरण मा. आयुक्त श्री. सुदामराव गायकवाड यांनी पाठविलेले आहे. उपहारगृहाचे प्रकरण श्री. आर. डी. शिंदे साहेबांनी पाठविलेले नाही. उपहारगृहाचे प्रकरण तीन महिन्यापूर्वी राज्य शासनाकडे पाठविलेले आहे. जर आपण प्रत्येक वेळेला या प्रकरणावर यापूर्वी चर्चा करित होतो. मग या विषयाची चाहुल त्यावेळेला का लागलेली नव्हती. आता हे प्रकरण शासनाकडे पाठविलेले आहे.

**गजानन भोईर :-**

शासनाकडून काय आले? ते सांगा.

**रतन पाटील :-**

शासनाकडून काय आले? जर शासनाकडून निर्णय येणार असेल तर तो निर्णय कधी येणार?

**गजानन भोईर :-**

मा. आयुक्त साहेब स्वतः उपहारगृहाच्या विषयाबाबत बोलले होते.

**विजय पाटील :-**

महाराष्ट्र शासनाकडे दि. १८/०१/२००६ रोजी कक्ष अधिकारी नगरविकास विभाग यांना पत्र पाठविलेले आहे.

**मिलन पाटील :-**

तुम्हाला त्या पत्राचे उत्तर आलेले आहे का?

**विजय पाटील :-**

त्यांनी त्या पत्रामध्ये मार्गदर्शन मागविलेले होते. परंतु, अजुनपर्यंत त्या पत्राचे उत्तर आलेले नाही. मी तुम्हाला पत्र वाचून दाखवतो. उपरोक्त विषयानुसार आपणांस उपस्थित केलेल्या मुद्यावर खालीलप्रमाणे खुलासा करित आहे. उपहारगृह चालविण्याबाबत निविदा मागविण्यात आल्या असता दोन्हीही निविदा धारकांनी समसमान रक्कम असल्यामुळे तत्कालीन मा. उप-आयुक्त साहेब यांनी चर्चेकरिता बोलविले असता फक्त श्रीम. स्वाती नितिन कदम ह्या वेळेवर हजर राहून रु. १०,५०१/- या रक्कमेचे उपहारगृह चालविण्यास तयार असल्याचे पत्र पाठविलेले आहे. सदरची बाब मा. स्थायी समितीला निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यावेळेस मा. स्थायी समिती दि. १३/६/२००५ ठराव क्र.३०च्या ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी असे रुलिंग दिलेले आहे. त्याची प्रत यासोबत जोडलेली आहे. अशा परिस्थितीत योग्य ते मार्गदर्शन करावे. श्रीम. स्वाती नितिन कदम यांनी रु. १०,५०१/- या रक्कमेचे उपहारगृह चालविण्यास तयार असल्याचे पत्र दिलेले आहे. सन्मा. सदस्य मोहन पाटील साहेब, तुम्ही त्यावेळेला मा. सभापती होते.

**जयंत पाटील :-**

परंतु, तुम्ही हा उपहारगृहाचा विषय शासनाकडे का पाठवला?

**विजय पाटील :-**

शासनाकडे पत्र पाठवण्याचे कारण असे आहे की मा. आयुक्त साहेबांनी दोन ठेकेदारांना आमंत्रित केलेले होते.

**गजानन भोईर :-**

तुम्ही प्रथम टेन्डर काढा.

**विजय पाटील :-**

टेन्डरपासुन सुरुवात करु का?

**जयंत पाटील :-**

तुम्ही उपहारगृहाचा विषय शासनाकडे का पाठविला? एवढेच मी विचारले आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही हा विषय घेऊच नका. शासनाकडे पत्र पाठवले आहे. त्याला काय कारण आहे? आपण उपहारगृहाच्या विषयाचा ठराव करुन विषय कॅन्सल करुया.

**जयंत पाटील :-**

तुम्ही उपहारगृहाचा विषय शासनाकडे कुठल्या नियमाने पाठवलेला आहे? अशा अनेक गोष्टी घडतात. दोन-दोन निविदासुध्दा येतात. परंतु, आपण हा विषय शासनाकडे कधीही पाठवत नाही.

**मोहन पाटील :-**

आपण हा विषय कॅन्सल करण्याबाबत मी बोलत आहे.

**जयंत पाटील :-**

उपहारगृहाचा विषय शासनाकडे पाठवून कुठेतरी मिसगाईड करायचे किंवा कोणीतरी मिसगाईड करित आहे आणि फक्त टाईमपास करासचा याच्या पलिकडे काहीही नाही.

**मोहन पाटील :-**

प्रशासनाला हा ठराव मंजूर नाही. आपण तो ठराव प्रशासनाच्या आखत्यरीत कॅन्सल करायला पाठवत आहोत. तेव्हा त्यांना आर्थिक नुकसान दिसले नाही का? मग तुम्ही हा विषय पुन्हा इथे कशाला घेता?मा. सभापती महोदय तुम्ही सुमोठे विषय घेताना अधिका-यांना बोलवायला पाहिजे होते. ते अधिकारीसुध्दा आलेले नाहीत.

**जयंत पाटील :-**

तुम्ही प्रथम ण्क गोष्ट लक्षात घ्या की मघाशी सन्मा. सदस्य रतन पाटील बोलले की, उपहारगृहाचा विषय शासनाकडे पाठविलेला आहे. त्यामुळे या विषयावर चर्चा नको. शासन म्हणजे कोर्ट नाही. उपहारगृहाचा

विषय कोर्टामध्ये पाठविलेला नाही. तुम्ही या ठिकाणी ठराव करा. पुन्हा निविदा मागवा आणि कॅन्टीन ताबडतोब कशी चालू होईल ते बघा.

**गजानन भोईर :-**

तुम्ही कॅन्टीनबाबतचा ठराव करा.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब, माझ्या बोलण्याचा तसा अर्थ नव्हता. जर तुम्ही कॅन्टीन करत असाल तर कॅन्टीनबाबतचा ठराव आजच घ्या. आजच कॅन्टीनच्या विषयाचा ठराव घ्या.

**विजय पाटील :-**

मी आजच ठराव मागवतो आणि लगेच मंजुरी घेतो.

**गजानन भोईर :-**

मा. सभापती साहेब, याच मिटींगमध्ये ठराव घ्या.

**मा. सभापती :-**

या ठिकाणी वारंवार उपहारगृहाचा विषय येतो. आपल्या प्रशासनाच्या अधिका-यांनी उपहारगृहाचा विषय शासनाकडे पाठविलेला आहे. परंतु, आपण सर्व सदस्य मिळून पुढच्या मिटींगला ठराव करुन त्या विषयाची अंमलबजावणी करुया.

**रतन पाटील :-**

तुम्ही उपहारगृहाचे प्रकरण शासनाकडून परत मागवून घ्या. मा. सभापती साहेब, तुम्ही त्या विषयाचा ठराव करुन घ्या आणि ठरावात शासनाकडे गेलेले प्रकरण परत मागवण्याचे नमुद करुन शासनाकडे पाठविलेले प्रकरण परत मागवून घ्या.

**गजानन भोईर :-**

शासनाकडे गेलेले प्रकरण परत मागवायचे नाही.

**मा. सभापती :-**

नवीन टेन्डर काढण्याविषयीचा ठराव आहे.

**जयंत पाटील :-**

प्रकरण क्र. २२९ बरेच वर्षे या महापालिकेचे उपहारगृह बंद आहे. तुम्ही ते उपहारगृह ताबडतोब चालू करण्यासाठी निविदा काढाव्यात असा मी ठराव मांडत आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

या ठरावाला सर्वांचे अनुमोदन आहे.

**गजानन भोईर :-**

या ठरावाल सर्वांचे अनुमोदन घ्या.

**मा. सभापती :-**

उपहारगृहाच्या ठरावाला सर्वानुमते मान्यता दिलेली आहे. त्यामुळे पुढचा विषय घेण्यांत यावा.

**प्रकरण क्र. २२९ :-**

सन २००६-०७ वर्षाकरिता उपहारगृह ठेक्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. २३७ :-**

महानगरपालिका तळमजल्यावर असलेल्या उपहारगृह मागील ब-याच दिवसांपासून बंद असल्याने महानगरपालिकेचे कर्मचारी / अभ्यंगत यांची गैरसोय होत आहे. त्यामुळे सदर उपहारगृह भाड्याने देणेबाबत नव्याने फेरनिविदा मागवून कार्यवाही करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. जयंत पाटील.** **अनुमोदन :- श्री. प्रेमनाथ पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सचिवांनी प्रकरण क्र. २३० चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, सदर विषय खुप मोठा आहे. आम्हाला या विषयावर अभ्यास करायचा आहे. त्यामुळे तुम्ही हा विषय पुढच्या वेळेला घ्यावा.

**रतन पाटील :-**

आम्हाला या विषयावर अभ्यास करायचा आहे. त्यामुळे तुम्ही हा विषय पुढच्या वेळेला घ्यावा.

**गजानन भोईर :-**

मी सदर विषयाबाबत पत्र दिलेले आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सदर विषयाचा अहवाल सादर करुन घ्या आणि सदर विषयाची चर्चा पुढच्या मिटींगला करुया.

**रतन पाटील :-**

सदर विषयाचा अहवाल मागवून घ्या आणि सदर विषयावर चर्चा करण्यासाठी सेपरेट मिटींग लावा.

**मोहन पाटील :-**

आपण हा विषय पुढच्या मिटींगला घेण्यांत येईल. अहवाल सादर करुन घ्या असे चालणार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

सदरचा विषय पुढच्या मिटींगला घ्या.

**मोहन पाटील :-**

हा विषय पुढच्या मिटींगला घेऊया.

**जयंत पाटील :-**

उपहारगृहाच्या विषयाशी जे संबंधित अधिकारी असतील ते त्यावेळेला हजर हवेत.

**मोहन पाटील :-**

या विषयावर चर्चा करण्यासाठी दोन दिवसानंतर एक सेपरेट मिटींग लावा आणि चर्चा करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

सचिव साहेब, या विषयाशी संबंधित अधिकारी हजर पाहिजेत.

**मिलन पाटील :-**

या विषयाशी संबंधित अधिका-यांनी डिपार्टमेन्टवाईस माहिती द्यावी. त्यावेळेला त्या अधिका-याने हजर राहणे आवश्यक आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, सभा लावताना अधिकारी हजर राहणार आहेत की नाहीत ते त्या संबंधित अधिका-यांना विचारा. नाहीतर आम्ही सिक लिव्हवर आहोत, आम्हाला काहीतरी अर्जन्ट काम निघाले असे ते अधिकारी बोलतील.

**मिलन पाटील :-**

नाहीतर काही कोर्टाची कामे निघतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

संबंधित अधिकारी उपस्थित नसल्यामुळे तो विषय पेन्डिग राहिल.

**मिलन पाटील :-**

या अधिका-यांची त्यावेळेला कोर्टाची कामे निघतील.

**जयंत पाटील :-**

जे अधिकारी त्यादिवशी येणार नाहीत ते दोषी ठरतील.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, या ठिकाणी सन २००४-०५ चे वार्षिक लेखा परिक्षण करण्यात आलेले आहे. मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चा कलम १०६च्या ४ आणि ३ अन्वेये सदरचा अहवाल मुख्य लेखा परिक्षकामार्फत स्थायी समितीसमोर सादर केलेला आहे. याच्यामध्ये अहवाल सादर करावा अशीच तरतुद आहे. याच्यावर तुमच्या ज्या काही  सुचना असतील किंवा तुम्ही पुढे कुठल्या कामकाजाच्या वेळेला ह्याच्यामध्ये काय झाले काय झाले नाही हे माहित असेल तर तुम्ही हा मुद्दा उपस्थित करु शकता.

**जयंत पाटील :-**

खरे म्हणजे लेखा परिक्षक आणि महा लेखा परिक्षक याच्यामध्ये भरपुर त्रुटी दाखविलेल्या आहेत की, ज्याच्यावर चर्चा करण्यासाठी संपूर्ण दिवस जाऊ शकतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

परंतु, त्यांनी हा अहवाल सादर केलेला आहे हे आपल्याला मान्य करावे लागेल.

**जयंत पाटील :-**

तुम्ही हा विषय पुन्हा चर्चेला घेणार का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण उपहारगृहाचा विषय कधीही चर्चेला घेऊ शकतो.

**जयंत पाटील :-**

मग चालेल. मग आपण उपहारगृहाचा विषय सादर करुया.

**गजानन भोईर :-**

आपण हा विषय सादर करुन घेऊया.

**प्रकरण क्र. २३० :-**

सन २००४-०५ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल मा. स्थायी समितीस सादर करणे.

**ठराव क्र. २३८ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सचिवांनी प्रकरण क्र. २३१ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

बाजार लिलावाची एकही निविदा आलेली नाही.

**मिलन पाटील :-**

सदर प्रकरणाची एकच निविदा आलेली आहे. त्यामुळे या निविदेची पुन्हा फेरनिविदा काढण्यात यावी.

**कैलासबेन जानी :-**

फेर निविदा कशाला काढायची?

**सुर्यकांत भोईर :-**

बाजार निविदामध्ये एकच निविदा आलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

एक निविदा हायेस्ट रेटने आलेली आहे.

**जयंत पाटील :-**

रु. ८/- या कमी रेटने बाजार निविदा आलेली आहे. निविदा कमी रेटची असल्यामुळे ती परत काढली जाते.

**कैलासबेन जानी :-**

जर निविदेचा रेट बरोबर नसेल तर पहिलेच सांगायला पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

निविदा का रेट बढाया नही है।

**मोहन पाटील :-**

अभीतक एकही निविदा आयी है। और कितनी निविदा आनी चाहिए? वह बताईए।

**कैलासबेन जानी :-**

आप बोलते है वह बराबर है। लेकिन औरकी निविदा आनी चाहिए।

**मोहन पाटील :-**

एकही निविदा है। कमसे कम दो निविदा आनी चाहिए।

**रमेश जैन :-**

वह मिलके करते है।

**कैलासबेन जानी :-**

वह निविदा मिलकर करते है।

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ज्यादा निविदा आनेकी संभावना है।

**प्रेमनाथ पाटील :-**

जर अगोदर निविदा नाही आली मग काय करणार?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

इसमेभी ज्यादा निविदाकी डिमान्ड है।

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. विजय पाटील साहेब, मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये असे किती बाजार लिलाव बाकी आहेत? ते सांगा. तुम्हाला याच्यापेक्षा जास्त निविदा येण्याची शक्यता आहे का?

**कैलासबेन जानी :-**

जर जास्त दराच्या निविदा असेल तर कोणीही ठेकदार ती निविदा घेईल.

**एस. ए. खान :-**

उदाहरणार्थ आपण 'ना फरिवाला क्षेत्र' दिलेला आहे. तिथे सगळे फरिवाले बसणार आहेत. म्हणूण ते 'ना फेरिवाला क्षेत्र' आहे. मग 'ना फेरिवाला क्षेत्र'चे बोर्ड लावून फायदा नाही.

**कैलासबेन जानी :-**

एवढे पैसे भरलेले आहे. मग त्याचा फायदा आहे.

**मोहन पाटील :-**

आपण बांधकाम आणि इतर ह्याच्यामध्ये दोन-तीन वेळा निविदा मागवतो.

**एस. ए. खान :-**

आपण शहराचा फायदा न करता सत्यानाश करायचे सुरु केलेले आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही अजूनपर्यंत निविदांची सुरुवात केलेली नाही.

**गजानन भोईर :-**

उद्या ह्या निविदेपेक्षा कमी दराच्या निविदा आल्या तर त्याला कोण जबाबदार आहे?

**रतन पाटील :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ खाली कमीतकमी दोन निविदा पाहिजे असे नमुद केलेले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, जेव्हा जकातने सहकार एजन्सी घेतलेली होती. तेव्हा एकाने झीरो अमाऊन्ट टाकलेली होती आणि आपण त्यावेळेला फक्त सहकार एजन्सीची अमाऊन्ट पास केलेली होती. मग ती अमाऊन्ट कशी पास केली?

**रतन पाटील :-**

साहेब, मी फक्त नियम सांगितलेला आहे. परंतु, कमीतकमी दोन निविदा येणे आवश्यक आहे.

**कैलासबेन जानी :-**

हम लोगोने जकातको ऐकही निविदा दी थी।

**मोहन पाटील :-**

त्यावेळेला झीरो अमाऊन्टची निविदा आलेली होती. परंतु, आता झीरो अमाऊन्टची निविदा आलेली नाही.

**जयंत पाटील :-**

झीरो अमाऊन्टची निविदा नव्हती.

**मोहन पाटील :-**

झीरो अमाऊन्टची निविदा नव्हती.

**जयंत पाटील :-**

झीरो अमाऊन्टची निविदा असते का?

**मोहन पाटील :-**

झीरो अमाऊन्टची निविदा दिलेली होती.

**एस. ए. खान :-**

दहा फॉर्म विकले गेलेले आहेत आणि तेच फॉर्म निविदेसाठी भरले गेलेले आहेत.

**कैलासबेन जानी :-**

त्यांनी फार्म भरलेले होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

ही जी निविदा मिळालेली आहे. याच्यापेक्षा कमी अमाऊन्टची निविदा मिळेल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

निविदा वाढीव दराने द्यावी लागेल. जे काही दर होते त्याच्यापेक्षा वाढीव दराने मुदतवाढ द्यावी लागेल. ही मुदतवाढ एक महिन्यासाठी वाढवून द्यावी लागेल.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, रु. ९१ लाखाची निविदा आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

जर फेर निविदा काढायचे ठरले तर दि. ३० मार्चला मुदत संपणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मी तेच सांगतो की निविदा पास करुन घेता येईल. श्री. विजय पाटील साहेब आपण मागच्या वेळेलासुध्दा जास्त अमाऊन्ट भरलेली होती. आपण त्या निविदा मागवून घेतल्यानंतर आपल्याला त्याच उमाऊन्टने पैसे मिळाले होते.

**रतन पाटील :-**

तुम्ही एवढ्या कमी कालावधीमध्ये निविदा कशाला आणता? तुम्हाला थोडी पुढे निविदा घेता येत नाही का? बाकीच्या निविदा सहा-सहा महिने अगोदर येत आहेत. या निविदांसाठी वेळसुध्दा मिळत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

आम्हाला ही निविदा मंजूर आहे.

**एस. ए. खान :-**

आम्हाला ही निविदा मंजूर आहे.

**जयंत पाटील :-**

आम्हाला ही निविदा मंजूर आहे. ही निविदा चांगल्या दराने आलेली आहे. या निविदेची मुदत संपायला आलेली आहे आणि मा. उपायुक्तांनी गोषवारा त्यांच्या ड्रॉव्हरला दिलेला आहे. म्हणजे निविदा मंजूर करावी असे त्यांचे मत आहे. आम्ही निविदेच्या दराशी सहमत आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे बाजार लिलाव अजुनपर्यंत बाकी आहेत. माझे असे मत आहे की जर तुम्ही संपूर्ण निविदा एकदम काढल्या तर ते सोयीस्कर होईल.

**जयंत पाटील :-**

त्या निविदेची मुदत संपत आलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्या निविदेची मुदत संपलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बाकीच्या निविदेची मुदत बाकी आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तो भाग वेगळा आहे आणि हा भाग वेगळा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

बाकीच्या लोकांच्या निविदांची मुदत बाकी आहे. सगळ्यांची वर्षाची एकत्र किंवा एकदम निविदा काढा.

**गजानन भोईर :-**

सगळ्यांची एकत्र निविदा काढा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सगळ्यांची मुदत दि. ३१ मार्च रोजी संपणार आहे. आता फक्त दोन दिवस बाकी आहेत.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला कमी अमाऊन्ट दिलेली नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही ह्याच्यापेक्षा जास्त अमाऊन्ट वाढवा.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला तुमच्या अपेक्षेपेक्षा जास्त अमाऊन्ट दिलेली आहे.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, तुम्ही बोलता ते बरोबर आहे. परंतु, तुम्ही एकही निविदा आणली नाही तर तुम्ही अजेन्डा करताना या गोष्टीच्या इतर निविदा का आल्या नाहीत हे बोलणे योग्य होणार नाही.

**जयंत पाटील :-**

जर एखाद्या निविदेमुळे आपले नुकसान होत असेल तर आपण तिकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**मोहन पाटील :-**

प्रत्येक गोष्टीला निविदा हा प्रकार आहे आणि एकापेक्षा दोन निविदा येणे आवश्यक आहे. तुमच्या निविदा विदाऊट को-ऑपरेशन आली त्याचा काय अर्थ आहे?

**जयंत पाटील :-**

निविदांचे फॉर्म का भरलेले नाहीत?

**प्रेमनाथ पाटील :-**

जर एखादी निविदा कमी भावाने आली तर वेगळी गोष्ट होती. परंतु, आपल्याला अगाऊ वॉर्निंग मिळाली होती.

**मोहन पाटील :-**

तुम्ही निविदा रिकॉल करा. तुम्ही रिकॉल केल्यावर निविदा येईल.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही टेन्डर खोलायला नको होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

गेल्या वर्षीसुध्दा असे झालेले होते.

**एस. ए. खान :-**

तुम्ही निविदा खोलायला नको होती.

**प्रेमनाथ पाटील :-**

श्री. विजय पाटील साहेब, ह्याच्यामध्ये अजून काही वाढ होणार आहे का? जर वाढ होणार असेल तर रु. ९१ लाखाचे रु. १ करोड होणार असतील तर आम्ही निविदा खोलतो.

**मोहन पाटील :-**

तुम्ही निविदा खोलायला सांगता त्याप्रमाणे निविदा खोलायला पाहिजे होती.

**जयंत पाटील :-**

तुम्ही आता व्होटींग घ्या.

**गजानन भोईर :-**

कायदा तसाच आहे.

**कैलासबेन जानी :-**

जी निविदा आहे ती निविदा पास करुन घ्या.

**गजानन भोईर :-**

याबाबत तसा कायदा आहे. तुम्ही प्रथम मुदतवाढ द्या. नंतर काय ते बघूया.

**प्रेमनाथ पाटील :-**

मुदतवाढ कशाला द्यायची?

**कैलासबेन जानी :-**

जो निविदा है उसे पास करो।

**प्रेमनाथ पाटील :-**

गेल्या वर्षी एकाने रु. ८० हजार डिपॉझीट देऊन निविदा भरलेली होती आणि नंतर मला परवडत नाही असे सांगितलेले होते.

**जयंत पाटील :-**

मी प्रकरण क्र. २३१चा ठराव मांडत आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्ही ठराव मांडू नका.

**जयंत पाटील :-**

ठराव का मांडायचा नाही? आम्ही महापालिकेचे नुकसान कसे सहन करणार?

**मोहन पाटील :-**

महापलिकेचे नुकसान कसे होईल?

**जयंत पाटील :-**

दै. नवशक्ती, दै. सकाळ, दै. सुरजप्रकाश या तिन्ही वर्तमानपत्रामध्ये निविदेसंबंधी बातमी आलेली आहे. मग निविदा करणाऱ्या लोकांनी निविदा का भरल्या नाहीत?

**प्रेमनाथ पाटील :-**

निविदांचे फॉर्म किती विकत घेतलेले आहेत.

**जयंत पाटील :-**

फॉर्म गेलेले आहेत.

**रमेश जैन :-**

दस फॉर्म गये है।

**प्रेमनाथ पाटील :-**

दहा फॉर्म विकले गेलेले आहेत.

**जयंत पाटील :-**

निविदेची पुढच्या वर्षाची कोण गॅरन्टी देणार? आणि आम्हाला निविदेची काय आवश्यकता आहे? आम्हाला अपेक्षेपेक्षा जास्त दराची निविदा मिळालेली आहे. त्यामुळे महापालिकेचे नुकसान नसुन फायदा आहे.

**मोहन पाटील :-**

तुम्हाला निविदेचे दर त्या दरापेक्षा जास्त मिळाले मग काय करणार?

**जयंत पाटील :-**

निविदेचे दर जास्त मिळण्यासाठी फॉर्म भरायला पाहिजे होते.

**मोहन पाटील :-**

जर तुम्ही निविदा रिकॉल केल्यानंतर जास्त दर मिळाले मग आपल्याला सोयीस्करच आहे.

**जयंत पाटील :-**

परंतु, बाजार लिलावाच्या निविदेचे फॉर्म का भरले नाहीत? तेच आम्हाला कळत नाही. आपण निविदा पुन्हा मागवायच्या म्हणजे आम्ही पुन्हा वर्तमानपत्राच्या खर्च करित आहोत, पुन्हा ॲडव्हरटाईज देत आहोत.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही जे बोलता ते हे अपेक्षित समजत नाहीत.

**कैलासबेन जानी :-**

जेवढ्या जास्तीतास्त निविदा भरलेल्या आहेत. त्या सर्व निविदा पास करायला पाहिजेत.

**रमेश जैन :-**

मा. आयुक्त साहेबने इधर लिखा है की ठेकेदाराकडील दर खात्रीने व वेळोवेळी देण्यात येतील.

**जयंत पाटील :-**

आपण कशी गॅरन्टी देणार?

**कैलासबेन जानी :-**

पुरा डिटेलमे आया है।

**जयंत पाटील :-**

जर महापालिकेचा फायदा होत असेल तर आपण बघु या.

**रमेश जैन :-**

पुकारमे सब स्थायी समितीके बारेमे लिखा है।

**मा. सभापती :-**

निविदा वाढवून मिळतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

जर निविदा वाढवून मिळाली नाही तर मा. सभापती साहेबांच्या खिशातील पैसे गेलेले चालतील का?

**मा. सभापती :-**

निविदा जास्त दराने वाढवून मिळतील.

**प्रेमनाथ पाटील :-**

निविदा जास्त दराने वाढवून दिली जाईल याची सर्वजण गॅरन्टी देत आहेत.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य तुम्ही एकच लक्षात घ्या की या ठिकाणी एकच निविदा आहे.

**जयंत पाटील :-**

जर नंतर महापालिकेचे नुकसान झाले तर त्याला आम्ही जबाबदार नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

महापालिकेच्या नुकसानाला श्री. विजय पाटील जबाबदार राहतील.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महापालिकेच्या नुकसानाला श्री. विजय पाटील कसे जबाबदार राहतील?

**कैलासबेन जानी :-**

निविदा जास्त दराची असेल तर निविदा मंजूर करुन घ्या.

**एस. ए. खान :-**

तुम्ही निविदा मंजूर करुन घ्या.

**मा. सभापती :-**

९१ पेक्षा कमी निविदा मिळणार नाही याची आपण सर्वजण दक्षता घेऊया.

**मोहन पाटील :-**

आपण निविदा मंजूर करुया.

**कैलासबेन जानी :-**

तुम्ही निविदा मंजूर करा.

**रमेश जैन :-**

इससे और एक महिना बढेगा।

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण एक महिन्याचा कालावधी रद्द करुया.

**मा. सभापती :-**

संबंधित निविदा धारकाला किंवा संबंधित ठेकेदाराला एक महिन्याची मुदत वाढवून देण्यात यावी.

**गजानन भोईर :-**

निविदेचे दर जास्त येतील याची कोण खात्री घेईल?

**जयंत पाटील :-**

उद्या ही बाब कायदेशीर झाली किंवा याच्यामध्ये एखादी केस वगैरे झाली तर आम्ही याला जबाबदार नाही. तुम्हीच हा विषय या ठिकाणी आणलेला आहे. या ठिकाणी मा. आयुक्त साहेबांची टिपणीसुध्दा आहे.

**गजानन भोईर :-**

मा. सभापती महोदय, तुम्ही या ठिकाणी हा विषय का आणला?

**प्रेमनाथ पाटील :-**

या गोष्टीला स्थायी समिती जबाबदार नाही.

**सुर्यकांत भोईर :-**
आम्हीसुध्दा या गोष्टीला जबाबदार नाही.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
उद्या या विषयाला धरुन कोण कोर्टात गेले तर त्याला स्थायी समिती जबाबदार नाही.
**गजानन भोईर :-**
तुमची एकच निविदा आहे असे कायदा बोलतो.
**केशव घरत :-**
टेन्डर आलेले आहे म्हणून द्यायला पाहिजे.
**कैलासबेन जानी :-**
निविदा ओपन केली मग काय अर्थ आहे?
**प्रेमनाथ पाटील :-**
साहेब, माझी मागच्या वेळेला एक निविदा होती. ती निविदा एकच असल्यामुळे ओपन केलेली नव्हती. मग तुम्ही ही एकच निविदा ओपन का केली? तुम्ही ही निविदा ओपन करायला नको होती.
**जयंत पाटील :-**
मा. आयुक्त साहेबांना कायद्याचे ज्ञान आहे का? जर मा. आयुक्त साहेबांनी टिपणी दिली आणि या ठिकाणी गोषवारा दिला तर त्यांना ज्ञान असेल म्हणून असे केले असेल. याचा अर्थ ही निविदा नियमाला धरुन आहे. आम्ही याला जबाबदार नाही.
**रतन पाटील :-**
तुम्ही मा. आयुक्त साहेबांना बोलवा.
**रमेश जैन :-**
मा. उपायुक्त साहेब, कायदाका पालन करना चाहिए।
**कैलासबेन जानी :-**
निविदाके फॉर्मपर नाम देकर लिया होगा। तुम्ही फॉर्म घेतलेला आहे.
**रतन पाटील :-**
मा. सभापती साहेब, या संदर्भात उपायुक्त साहेंबांनी आपले मत मांडावे.
**जयंत पाटील :-**
हे प्रकरण कोर्टात जाऊ शकते.
**रतन पाटील :-**
जर उद्या बाजार लिलावाचे प्रकरण कोर्टात गेले तर पुन्हा हा विषय कॅन्टीनच्या विषयासारखा होईल.
**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
आपली कॅन्टीन बंद आहे का?
**एस. ए. खान :-**
कॅन्टीन बंद होऊन चार महिने झालेले आहेत.
**गजानन भोईर :-**
तुम्ही बाजार लिलावाचा विषय पेन्डिग ठेवा.
**प्रेमनाथ पाटील :-**
हा विषय पेन्डिग ठेवला तर पुन्हा या विषयासाठी तीन महिने जातील.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
बाजार लिलावाच्या विषयाची मुदत संपलेली आहे.
**गजानन भोईर :-**
बाजार लिलावाची मुदत संपलेली आहे.
**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**
दि. ३१ मार्च पूर्वी मुदत संपलेली आहे.
**गजानन भोईर :-**
जकात सारखे जास्त काही झाले तर प्रॉब्लम निर्माण होईल.
**जयंत पाटील :-**
याबाबत मा. उपायुक्त साहेबांनी त्यांचे मत व्यक्त करावे.
**रतन पाटील :-**
मा. उपायुक्त साहेबांनी त्यांचे मत मांडावे.
**जयंत पाटील :-**
कारण गोषवाऱ्यावर मा. उपायुक्त साहेबांची सही आहे.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
मा. सभापती साहेब रुलिंग देतील. मा. सभापती साहेबांनी ऑलरेडी रुलिंग दिलेले आहे.

**रमेश जैन :-**

ऐसा कुछ नही है।

**जयंत पाटील :-**

जर कोर्टाचे मॅटर निघाले तर आम्ही या गोष्टीला जबाबदार राहणार नाही. मा. उपायुक्त साहेब तुमचा गोषवारा असल्यामुळे तुम्ही तुमचे मत व्यक्त करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्हाला योग्य वाटत असेल तर तुम्ही तसे सांगा. आम्ही त्याप्रमाणे करतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती महोदयांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब यांनी या ठिकाणी प्रकरण क्र.२३१ सन २००६-०७ च्या बाजार लिलावाच्या बाबतीतील प्रशासकीय मत विचारलेले आहे. प्रशासनाने विषयांकीत बाजार लिलावाच्या अनुषंगाने दै. नवशक्ती, दै. सकाळ, दै. सुरज प्रकाश या पेपरमध्ये जाहिर प्रसिध्द देऊन निविदा मागविल्या असता एकूण दहा निविदांची विक्री झालेली होती. मुदतीच्या आतमध्ये एक निविदा प्राप्त झालेली होती. मा. आयुक्त साहेबांनी सदरच्या निविदा समितीमध्ये ओपन झाल्यानंतर प्राप्त दर रु. ९१ लाख ११०१ असल्याने आणि अपेक्षित दर रु. ७६ लाख ४५ हजारापेक्षा जास्त असल्याने त्या मंजूरीकरिता स्थायी समितीकडे शिफारस केलेली आहे.

**जयंत पाटील :-**

म्हणजे याच्यामध्ये नियमबाह्य काहीही घडलेले नाही.

**मा. सभापती :-**

जो नियम बनविलेला आहे. मी वाचून दाखविला.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जरी नियमाप्रमाणे एकच निविदा असली तरी ती निविदा किफायतशीर असल्यामुळे त्या निविदेची मंजूरीसाठी शिफारस केलेली आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, हे तुमचे मत आहे का?

**जयंत पाटील :-**

हे मा. उपायुक्त साहेबांचे मत आहे आणि मत बदलू शकत नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्याला चर्चा करुन झाल्यानंतर निर्णय होणे अपेक्षित आहे.

**मोहन पाटील :-**

दहा फॉर्म घेतले. मग त्याचा सत्कार होणार आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही याची चर्चा करायला पाहिजे. हे प्रॅक्टीकल आहे का? ते बघायला पाहिजे.

**मोहन पाटील :-**

दहा फॉर्म गेले म्हणजे चैन केली असा अर्थ होत नाही.

**जयंत पाटील :-**

आपल्या महापालिकेमध्ये ठेकेदारांनी एक संस्था किंवा युनियन बनविलेली आहे. खरे म्हणजे ठेकेदारामध्ये युनियन हा प्रकार नसतो. त्याच्यामुळे तुमच्या क्वालिटीवर खुप फरक पडतो.

**रतन पाटील :-**

महापालिका आणि तुमच्या क्वालिटीवर खुप फरक पडतो.

**जयंत पाटील :-**

जर कोणाला ज्ञान नसेल तर तो टेन्डर भरु शकतो, काहीही करु शकतो. कुठल्याही अटीशर्ती किंवा कुठल्याही निकषाचे पालन होत नाही असे आपण एकंदरीत बघितल्यावर आपल्याला आढळून येईल. कारण मी मध्यंतरी स्टडी केला होता त्याच्यामध्ये श्रमिक संस्थांना अनुदान हा विषय अवलोकनामध्ये असतो. परंतु, कुठलीही श्रमिक संस्था काम करित नाही. मी बांधकाम विभागाकडून शासनाचे आदेश मागवलेले आहेत. बांधकाम विभागाकडून मागवलेले शासनाचे आदेश सन १९८० की १९७९ असे कुठल्या तरी वर्षाचे आहेत. त्या आदेशानुसार या श्रमिक संस्थांनी स्वतः काम केले पाहिजे. कारण त्या संस्था आर्थिक दृष्ट्या सबळ होण्यासाठी किंवा कामगारांना रोजगार मिळण्यासाठी हा नियम बनविलेला आहे. परंतु, त्या संस्था दोन टक्के, पाच टक्के अमाऊन्ट घेऊन परस्पर कामे देतात. त्याच्यामध्ये कोण चेअरमन किंवा सेक्रेटरी असेल तर तो तिथे पैसे देतो. त्यांच्या इतर कोणत्याही कर्मचाऱ्यांना किंवा सभासदांना याची काहीही माहिती नसते. अशी माहिती मी काढलेली आहे. मी तो विषय महासभेत आणायला सांगणार आहे. या महापालिकेत अशा तऱ्हेच्या गोष्टी चालू आहेत. या शहराची अतिशय वाईट परिस्थिती बांधकामाच्या कॉन्ट्रॅक्टरमुळे झालेली आहे. याच्यामुळे जर महापालिकेला जास्त दराने आणि नियमाप्रमाणे निविदा मिळणार असतील तर तुम्ही त्या निविदा नाकारु नका. जर या निविदा नाकारल्या गेल्या आणि पुढच्या वेळेला कमी दराच्या निविदा आल्या तर तो कॉन्ट्रॅक्टर

कायदेशीर तरतुदीनुसार कोर्टात गेला तर त्याला सभागृहातील बहुसंख्य नगरसेवक जबाबदार नसतील. मी मा. सभापती साहेबांना विचारले की जर एखादी कायदेशीर बाब उत्पन्न झाली तर ते जबाबदार राहणार आहेत का? कॉन्ट्रॅक्टर हा विषय आणेल. तो विषय खुप दिवस कोर्टामध्ये चालेल. तुमचा मागचा कॉन्ट्रॅक्टर त्या दरानेच ठेका देईल. आपण त्याला वाढ दिली तरी त्याच्या दरानेच तो पैसे देईल. कारण त्याने मागच्या वेळेला कमी दराने ठेका घेतलेला होता. त्यामुळे तुम्ही हे नुकसान का करता? तेच मला कळत नाही. या कायदेशीर बाबीला कोण जबाबदार राहील? ते तुम्ही बघा.

**मोहन पाटील :-**

तो ठेकेदार कोर्टात कसा जाईल? जर त्याची एकच निविदा आली तर तो ठेकेदार कोर्टात जाऊ शकत नाही.

**जयंत पाटील :-**

जर एक निविदा आली तर मा. आयुक्त साहेबांना याबाबतीत ज्ञान नाही का? मा. आयुक्तांनी हा विषय इकडे कशाला आणला?

**मोहन पाटील :-**

एक निविदा आली तर वेगळा विषय आहे. परंतु, आपल्याकडे कमीतकमी एक किंवा दोन निविदा यायला पाहिजेत.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील, मला तुमचे म्हणणे समजले. परंतु, मुळात असा प्रश्न आहे की त्या ठेकेदाराने मा. आयुक्त साहेबांच्या गोषवाऱ्यामध्ये वाढ करुन शासनाला दाखविलेले आहेत. जर तुम्हाला रु. ७६ लाखापेक्षा ९१ लाख मिळत आहेत तर याच्यामध्ये महापालिकेचे नुकसान नाही. जर रु. ७६ लाखापेक्षा कमी निविदा असतील आणि त्या निविदा एक किंवा दोन असल्या तरी तुम्ही नाकारु शकता. तुम्ही सांगू शकाल की या ठिकाणी आमच्या अपेक्षेपेक्षा अमाऊन्ट कमी आहे. तर तुम्हाला निविदा नाकारता येते. त्या ठेकेदाराने असे दर दिलेले आहेत. ह्याच्यामध्ये महापालिकेचा फायदा आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, जर आपल्याकडे एक निविदा आली तर आपण एक निविदा उघडू शकतो का?

**कैलासबेन जानी :-**

आपण एक निविदा उघडू शकतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

मागच्या वेळेला बसंधकामाची एक निविदा आलेली होती. त्यावेळेला ती लोक बोलली की हा आमचा अधिकार नसून मा. आयुक्त साहेबांचा अधिकार आहे. त्यांनी ती निविदा ओपन न करता फेरनिविदा मागवलेली होती. त्यांनी ती निविदा ओपन करण्यापूर्वी फेरनिविदा मागितलेली होती. ती निविदा ओपन केलेली नव्हती. तुम्हाला हे सगळे माहित असताना तुम्ही ही निविदा ओपन का केली?

**गजानन भोईर :-**

निविदा ओपन कशी करणार?

**प्रेमनाथ पाटील :-**

ही निविदा जास्त रक्कमेची आहे असे तुम्हाला माहिती होते का? जर ही निविदा कमी रकमेची कमी आली असेल तर तुम्ही काय केले असते?

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील यांचे म्हणणे बरोबर आहे. मागच्या वेळेला खाडीच्या बांधकामाची निविदा आलेली होती. ती निविदा ओपन केलेली नव्हती आणि तिकडेच विषय संपला होता. परंतु, ही निविदा ओपन केलेली असल्यामुळे ही निविदा आपल्यासमोर आलेली आहे.

**मोहन पाटील :-**

प्रशासनाने ही निविदा का ओपन केली? हासुध्दा एक विषय आहे.

**गजानन भोईर :-**

त्याच्यावर मा. आयुक्त साहेबांनी मत मांडायला पाहिजे. मा. आयुाक्त साहेबांना येऊ दे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हा ठेका दि. ३१ मार्च पर्यंतचा आहे. निविदा ओपन करण्याचा मुख्य कारण म्हणजे जुन्या ठेकेदाराचा ठेका संपत आला आहे. याशिवाय दुसरा अर्थ काहीही नाही.

**कैलासबेन जानी :-**

एकदाच काय ते समजु द्या. सगळ्यांना योग्य ती माहिती मिळू दे.

**मा. सभापती :-**

जुन्या ठेकेदाराचा ठेका दि. ३१ मार्चपर्यंत संपत आलेला आहे.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, उद्या ३१ तारीख आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ज्यावेळेला निविदा ओपन केलेली होती, मी त्यावेळेला सर्व परिस्थिती सांगितलेली होती.

**मा. सभापती :-**

माझेसुध्दा तेच म्हणणे आहे की ३१ तारखेला ठेकेदाराची मुदत संपलेली होती. आपण आता किती लोकांना मुदत वाढवून दिलेली आहे.

**मोहन पाटील :-**

बऱ्याच लोकांना मुदत वाढवून दिलेली आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपण मुदत वाढवून दिलेली आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेबांनी मांडलेल्या मुद्याप्रमाणे ओपन केलेल्या निविदेची मुदत कमी राहिली असती तर त्यांनी आपल्याकडे शिफारस केली नसती. निविदा ओपन केल्यामुळे फार मोठा फरक पडत नाही. हे सत्य आहे.

**जयंत पाटील :-**

हे सत्य असले तरी याच्यामुळे महापालिकेचे नुकसान होणार आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याच्यामुळे महापालिकेच नुकसान होणार नाही. म्हणून शिफारस केलेली आहे.

**मोहन पाटील :-**

महापालिकेचे नुकसान होणार नाही ही गोष्ट बरोबर आहे. परंतु, जर या निविदेपेक्षा जास्त रक्कमेची निविदा आली तर तुम्ही काय करणार?

**गजानन भोईर :-**

हा जर-तरचा विषय झाला.

**मा. सभापती :-**

मी सर्व सन्मा. सदस्यांना सांगू इच्छितो की संबंधित ठेकेदाराला मुदत देण्याचा विषय या ठिकाणी आलेला आहे. आपण त्या कॉन्ट्रॅक्टरला एक महिन्याची मुदतवाढ देणार आहोत. आपल्याला तो ठेका रु. ९१ लाखाचा आलेला आहे.

**कैलासबेन जानी :-**

असे होऊ शकत नाही.

**मा. सभापती :-**

प्रथम मला बोलू द्या. मी बोलतो ते तुम्ही ऐकूण घ्या. नंतर बोला. आपण ठेकेदाराला मुदतवाढ दिल्यानंतर ज्या ठेकेदाराची रु. ९१ लाखाची निविदा आलेली आहे. त्यापेक्षा जो वाढीव उमाऊन्ट देईल त्याच कॉन्ट्रॅक्टरला पुन्हा टेन्डर देण्यात येईल.

**रमेश जैन :-**

फिर रु. ३ लाखसे ज्यादा हो जायेगा।

**जयंत पाटील :-**

तुम्ही त्या गोष्टीला एक वर्षाची मुदत घ्या.

**रमेश जैन :-**

रु. ३ लाखका लॉस होनेवाना है।

**कैलासबेन जानी :-**

कोई लॉस नही होगा।

**जयंत पाटील :-**

मुळात तुमचा एक महिन्याचा लॉस होणारच आहे.

**कैलासबेन जानी :-**

अगर ये टेन्डर दुसरेको देगा तो ऐसेभी रु. ३ लाखका लॉस होनेवाला है।

**रमेश जैन :-**

हम लोग उसको रु. ३ लाख बढाके देंगे तो लॉस होनेवाला है और उसको यह रु. ३ लाख - रु. ४ लाख आगे बढाके देंगे तो उस ठेकेदारका और स्टॅडींग कमिटीकाभी नुकसान होनेवाला है। दोनो नुकसान होनेवाला है।

**कैलासबेन जानी :-**

पहलेकी बात अलग है। अभी अलग है। हम लोग उस ठेकेदारको एक महिनेकी मुदत देंगे तो वही सब नुकसान होनेवाला है।

**सुर्यकांत भोईर :-**

जर कमी रक्कमेची निविदा आली तर तुम्ही त्याची जबाबदारी घेणार आहात का?

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, आपण महापालिकेचे नुकसान करित आहोत.

**सुर्यकांत भोईर :-**

कमी रक्कमेची निविदा आली तर तुम्ही त्याला जबाबदार आहात. आम्हाला दोष द्यायचा नाही.

**मा. सभापती :-**

कॉन्ट्रॅक्टर कोण आहे ते बघायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही जबाबदार आहात का? याचा काय अर्थ आहे? तुम्ही हा ठराव मताला टाका. आम्ही मतदान करायला तयार आहोत. आम्ही या ठरावाच्या बरोबर आहोत.

**मा. सभापती :-**

मी तुमच्या मताशी सहमत आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही आमच्या ठरावाशी सहमत नाही. तुम्ही चुकीचे रुलिंग देऊ नका.

**कैलासबेन जानी :-**

जर एक महिन्याची मुदत वाढवली तरी काय फायदा नाही.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, तुम्ही चुकीचे रुलिंग देत आहात. तुम्हाला गेले एक महिना मागचा कॉन्ट्रॅक्टर मागच्याच दराने पैसे देत आहे. तो कॉन्ट्रॅक्टर रु. ९१ लाख किंवा रु. १ करोडच्या दराने पैसे देणार आहे का? त्या कॉन्ट्रॅक्टरचा जो दर आहे त्या दरानेच तुम्हाला पैसे देणार आहे. जर ती व्यक्ती कोर्टामध्ये गेली आणि हे प्रकरण सहा महिने किंवा वर्षभर रखडले तर तो मागच्या दरानेच पैसे देईल.

**कैलासबेन जानी :-**

तो कॉन्ट्रॅक्टर मागच्या दराने पैसे देईल हे बरोबर आहे.

**जयंत पाटील :-**

मग ह्या नुकसानाला कोण जबाबदार आहे? मी या गोष्टीसाठी सभात्याग करतो. कारण मला चुकीचे रुलिंग चालणार नाही. तुम्ही एक महिन्याची मुदतवाढ कशी देता? तुम्हाला एक महिन्याची मुदतवाढ देण्याचा अधिकार नाही.

**मा. सभापती :-**

त्या कॉन्ट्रॅक्टरला एक महिन्याची मुदतवाढ द्यावी लागेल. कारण रु. ७६ लाख कोण कशाला आणून देईल?

**कैलासबेन जानी :-**

या ठिकाणी रु. ४ लाखाचे नुकसान होणार आहे. म्हणून आम्ही बोलत आहोत.

**मा. सभापती :-**

नगरपालिकेला रु. ७६ लाख पुरेसे आहेत. त्यासाठी पुन्हा ऑर्डर कशाला द्यायला पाहिजे? आपण रु. ९१ च्या दरापेक्षा रु. ९५ च्या दरानेच निविदा देऊया.

**जयंत पाटील :-**

परंतु, रु. ९५च्या दराने निविदा कशी देणार?

**प्रेमनाथ पाटील :-**

तुम्ही याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना विचारा.

**गजानन भोईर :-**

या सर्व निविदांमध्ये ज्या-ज्या निविदांची अमाऊन्ट डाऊन आहे. त्याच निविदा स्विकारल्या जाणार आहेत.

**जयंत पाटील :-**

तुम्ही ठराव मांडा. माझे त्या ठरावाला अनुमोदन आहे.

**कैलासबेन जानी :-**

जर निविदा जुन्या भावाने दिली तर आम्हाला चालणार आहे. परंतु, त्यामुळे आपल्या महानगरपालिकेचे नुकसान होणार आहे. त्याच्यामुळे आपल्याला काहीही फरक पडणार नाही.

(सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील यांनी ठरावाचे वाचन केले.)

**रमेश जैन :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २३१ :-**

सन २००६-२००७ चे बाजार लिलावांच्या निविदांस मंजुरी देणे बाबत.

**ठराव क्र. २३९ :-**

महानगरपालिका आपल्या क्षेत्रातील मिरा ते चेणा, मुर्धा ते उत्तन, भाईंदर (पुर्व), भाईंदर (पश्चिम) या विभागाचा बाजार वसुलीचा ठेका प्रती वर्षी करीत असते. मिरा त चेणा या विभागाची बाजार लिलावाची मुदत ३१ मार्च २००६ रोजी संपत असल्याने या बाजाराची निविदा सन २००६-२००७ करिता मागवण्यात आलेली आहे. सन २००५-२००६ करिता मिरारोड ते चेणा या विभागाची बाजार वसुली ठेका रक्कम रु. ६९,५०,०००/- इतकी होती. सन २००५-२००६ या वर्षामधील या रक्कमेमध्ये १०% वाढ करुन रु. ७६,४५,०००/- रक्कम निश्चित करुन दैनिक वृत्तपत्रात जाहीरात प्रसिद्ध करुन बंद लिफाफ्यामध्ये **''बाजार लिलाव निविदा''** रोजी मागवण्यांत आल्या होत्या.

मिरा रोड ते चेणा या बाजार वसुली ठेक्याकरिता एकूण निविदा फॉर्म्सची विक्री १० झालेली होती.

१० निविदा धारकापैकी महानगरपालिकेकडे दि. १३/०३/२००६ रोजी श्री. दिपक वालजी वाघेले यांनी सिलबंद लिफाफ्यामध्ये मुदतीत निविदा सादर केलेली असून निविदेत भरलेली रक्कम रु. ९१,०१,१०१/- (अक्षरी रु. एक्यान्नव लाख एक हजार एकशे एक मात्र) इतकी आहे.

सदरची आलेली निविदा महानगरपालिकेने निश्चित केलेल्या रक्कमेपेक्षा ३० टक्के वाढीव भरण्यात आलेली आहे, तरी मिरा ते चेणा ह्या विभागातील बाजार वसुलीचा ठेका श्री. दिपक वालजी वाघेले यांना रु. ९१,०१,१०१/- (अक्षरी रु. एक्यान्नव लाख एक हजार एकशे एक मात्र) रक्कमेस देणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. रमेश जैन.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सचिवांनी प्रकरण क्र. २३२ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. एस्. ए. खान ह्यांनी सभागृहासमोर ठरावाचे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मागच्या वेळेला कल्याण-डोंबिवलीचेच सॉफ्टवेअर मागितलेले होते का?

**केशव घरत :-**

अगोदरचे कल्याण-डोंबिवलीचे सॉफ्टवेअर होते का? माझे म्हणणे असे आहे की आपण मागच्या वेळेला कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचेच सॉफ्टवेअर घेऊ शकतो का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण मागच्या वेळेला कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच सॉफ्टवेअर घेत होतो. त्यामुळे आपण कल्याण-डोंबिवलीमधीलच टेक्नीकल आणलेले आहेत.

**केशव घरत :-**

जर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या चुका झाल्या तरी आपण त्यांच्याकडूनच सॉफ्टवेअर घ्यायचे का?

**मोहन पाटील :-**

मी यांना सॉफ्टवेअरबाबत सांगितलेले आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण ते सॉफ्टवेअर दुरुस्त करुन घेतलेले आहेत.

**मोहन पाटील :-**

सगळ्या चुका दुरुस्त करुन घेण्यात आलेल्या आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमधून आलेल्या सॉफ्टवेअरमुळे जी बिले चुकीची येत होती किंवा जी सॉफ्टवेअरमध्ये दुरुस्ती करायची बाकी होती ती दुरुस्ती करण्यात आलेली आहे.

**केशव घरत :-**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने दिलेल्या सॉफ्टवेअरमध्ये ब-याचश्या चुका आहेत. त्या चुका पुन्हा त्याच पध्दतीने होणार असतील तर आपल्याला त्या सॉफ्टवेअरचा काहीही फायदा नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने सॉफ्टवेअरबाबत केलेल्या ॲग्रीमेन्टमध्ये तसा उल्लेख केलेला आहे. आपल्याला सॉफ्टवेअरमधील वेळोवेळी होणाऱ्या चुका टेक्नीकल असिस्टन्टकडून दुरुस्त करुन घेता येतील.

**रतन पाटील :-**

साहेब, त्यांच्या मध्यंतरीच्या चुकीमुळे आपले काम थांबलेले होते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण त्यासाठी टेक्निकल असिस्टन्ट आणून त्या चुका दुरुस्त करुन घेतलेल्या आहेत.

**केशव घरत :-**

आता ते कर्मचारी त्यांचे असणार आहेत का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त सो.) :-**

फक्त पाच-सहा महिन्यापुरता असणार आहेत. नंतर प्रॉब्लम येणार नाही.

**रतन पाटील :-**

यांना सहा महिन्याकरिता मुदत दिलेली आहे का?

**एस. ए. खान :-**

सहा महिन्याकरिता मुदत दिलेली आहे.

**प्रकरण क्र. २३२ :-**

e-Governanace करीता कल्याण डोंबीवली महानगरपालिकेकडून तांत्रिक सेवा घेणेस मंजुरी देणे.

**ठराव क्र. २४० :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून घेतलेला सॉफ्टवेअर मॉडेल्स मध्ये आवश्यक सुधारणा करणेकामी तसेच वेळोवेळी येणाऱ्या अडी-अडचणी सोडवीणेकामी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडुन तांत्रीक सेवा घेणे आवश्यक असल्याने त्यांचे प्रतिनिधी मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये कार्यरत असुन मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी दि. २९/१२/२००५ नुसार १ सप्टेंबर २००५ पासून तांत्रीक सेवा करार नियमीत करणेबाबत व प्रति महिना रु. १,९६,०००/- चार्जेसचा प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु सदर चार्जेस जास्त असल्याने चार्जेस कमी करणेबाबत मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांना दि. २७/०१/२००६ चे पत्राने कळविल्यानंतर रु. १०,०००/- कमी करुन क.डों.मनपाने दि. १८/०२/२००६ रोजी रु. १,८६,०००/- रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

सदरची सेवा आवश्यक असल्यामुळे व ती कल्याण डोंबिवली महानगरपालिका कडूनच घेणे बंधनकारक असल्यामुळे १ डिसेंबर २००५ पासून सहा महिन्यांकरिता तांत्रीक सेवा करार करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. एस्. ए. खान. अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सचिवांनी प्रकरण क्र. २३३ चे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

आम्हाला हा विषय समजलेला नाही.

**केशव घरत :-**

तुम्ही आम्हाला हा विषय समजावून सांगाल तर बरे होईल.

**सुर्यकांत भोईर :-**

तुम्ही आम्हाला हा विषय समजावून सांगाल तर बरे होईल.

**दिपक खांबित :-**

हा कर्मचाऱ्यांचा विषय आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कर्मचाऱ्यांच्या पगारातुन जी काही भविष्य निर्वाह निधीची रक्कम नियमाप्रमाणे वजा केली जाते आपल्याकडे ती रक्कम फिक्स डिपॉझीटमध्ये ठेवली जाते. ती रक्कम त्या कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतर किंवा मॅच्युरिटीनंतर देय केली जाते. त्यावर मिळणारे इन्टरेस्ट आणि त्यांना अपेक्षित असलेले इन्टरेस्ट याच्यामध्ये तफावत आहे. आपण हे ज्या ठेवीमध्ये ठेवतो त्याच्यावर मार्केट रेटप्रमाणे इन्टरेस्ट मिळतो. परंतु, आपल्याला त्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या निर्देशाप्रमाणे भविष्य निर्वाह निधी द्यावा लागतो. तो जो डिफरन्स आहेतो

साधारणपणे रु. ४० लाख ९७ हजार ९०७ आणि ६० पैसे आहे. आपल्याला ही रक्कम त्या फन्डातुन त्या खात्यामध्ये वर्ग करण्याची मान्यता अपेक्षित आहे. आपल्याला मार्केट व्याजाचा फरक जमा करावा लागणार आहे.

(सन्मा. सदस्य एस. ए. खान यांनी ठरावाचे वाचन केले.)

**मिलन पाटील :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

हा ठराव मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. २३३ :-**

भविष्य निर्वाह निधी खात्यावरील रक्कमेच्या तफावतीची रक्कम भरणे बाबत.

**ठराव क्र. २४१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील तत्कालीन ग्रामपंचायती पासून कार्यरत कर्मचाऱ्यांच्या वेतनातून प्रत्येक महिन्यास ठराविक रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करण्यांत येते. ही कर्मचाऱ्यांची जमा होणारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम भारतीय स्टेट बँक भाईंदर शाखेत स्वतंत्र खाते उघडून त्यात नियमित जमा केली जाते. बँक सदर खात्यावर जमा असलेल्या रक्कमेवर बँकेच्या त्यावेळच्या प्रचलित बचतीच्या दराने जमा रक्कमेवर व्याज देते. सदर बँकेचा व्याजाचा दर हा अत्यंत कमी असल्यामुळे दरमहा जमा होणाऱ्या रक्कमेपैकी काही रक्कम कर्मचाऱ्यांना अग्रीम अथवा सेवानिवृत्त / मयत यांचे अतिम देय रकमेपोटी तरतूद रक्कम शिल्लक ठेवून उर्वरीत रक्कम मुदतठेवीत व दिर्घ मुदतीचया ठेवीत गुंतवणूक केली जाते. परंतू, गुंतवणूकीवर मिळणारे व्याज हे अल्प असते. अशा प्रकारे बँकेत जमा असलेल्या रक्कमेवर व गुंतवणूक केलेल्या रक्कमेवरील व्याज दर पाहता कर्मचाऱ्यांना दरवर्षी त्याच्या खाती जमा असलेल्या भविष्य निर्वाह निधीच्या वर्गणीवर शासनाने निश्चित केलेल्या व्याज दराप्रमाणे एकूण जमा होणारी रक्कम पाहता भविष्य निर्वाह निधीवर मुदतठेव व बँकेमार्फत शिल्लक असलेल्य रक्कमेवर मिळणारे व्याज याची एकत्रित व्याज रक्कम करता शासनाने भविष्य निर्वाह निधी करीता निर्धारीत केलेले व्याजाचे दर हे जास्त असल्यामुळे येणारी व्याजाची रक्कम अधिक होते व बँकेकडून मुदतठेव व अन्य मार्गानी मिळणारे व्याज हे कमी असल्यामुळे रोकड वही व बँक पास बुक यांत तफावत आढळून येते. या तफावती बाबत महापालिकेचे A.G. च्या झालेल्या लेखा परिक्षणात तीव्र आक्षेप घेतलेला आहे. त्यामुळे गेल्या अनेक वर्षापासून भविष्य निर्वाह निधी खात्यत आढळून यत असलेली व्याजामुळेची तफावत पूर्णपणे दूर करणकरीत महापालिका फंडातून अंदाजपत्रकात भविष्य निर्वाह निधी अंशदान या लेखाशिर्षाखाली दरवर्षी तरतूद ठेवून त्या तरतुदीमधून दरवर्षी ३१ मार्च पूर्वी टप्प्याटप्प्याने तफावतीची रक्कम भरल्याने भविष्य निर्वाह निधीचे लेखे अद्यावत व जुळते होण्यास मदत होऊन A.G. च्या लेखा परिक्षणात काढलेल्या लेखा आक्षेपाची पुर्तता होणार असल्याने पुढील दिलेल्या परिशिष्ट 'अ' मधील तफावती प्रमाणे रक्कम महानगरपालिका फंडातून भविष्य निर्वाह निधी खाती जमा करणेस व पुढे वेळोवेळी तरतुद ठेवून देय फरक भरणेस मान्यता देण्यात येत असून होणाऱ्या वित्तीय तसेच प्रशासकिय खर्चास सभेची मान्यता आहे.

**परिशिष्ट 'अ'**

| | **रुपये** | **पैसे** |
|---|---|---|
| सन २००४-०५ मार्च अखेर व्याजासह रक्कम (नमुना ९८ प्रमाणे)<br>वजा -- सन २००४-०५ मार्च अखेर रोकडवही (नमुना - १००) प्रमाणे | रु. ४,०४,०८,६३७ | ०० |
| प्रत्यक्षात जमा असलेली रक्कम (रु. ३,४३,७१,५००.४० + F.D. व्याज रु. १९,३९,२२९.६०) | रु. ३,६३,१०,७३० | ४० |
| **तफावत रक्कम** | **रु. ४०,९७,९०७** | **६०** |

**सुचक :- ॲड. श्री. एस्. ए. खान.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सचिवांनी प्रकरण क्र. २३४ चे वाचन केले.)

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जसा मुख्य लेखा परिक्षकाचा अहवाल आहेतसाच हासुध्दा प्रशासकीय अहवाल आहे. हे सादर आहे.

**रतन पाटील :-**

हा विषय पुढच्या मिटींगमध्ये घेण्यात यावा

**सुर्यकांत भोईर :-**

हा विषय पुढच्या मिटींगमध्ये घ्या.

**मिलन पाटील :-**

हा विषय पुढच्या मिटींगमध्ये घ्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

परंतु, अहवाल सादर करुया.

**रतन पाटील :-**

तुम्ही अहवाल आता सादर करा. परंतु, चर्चा पुढच्या मिटींगमध्ये करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

वेबसाईट तयार करण्याचा अहवाल आहे.

**प्रकरण क्र. २३४ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ नुसार प्रशासन अहवालाबाबत.

**ठराव क्र. २४२ :-**

मा. सभापती सो. ह्यांच्या आदेशानुसार सदरचा विषय पुढील सभेत घेण्याचे ठरविण्यांत आले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सचिवांनी प्रकरण क्र. २३५ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी ठरावाचे वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मोहन पाटील :-**

या ठरावात महानगरपालिका निधीतुन फक्त रु. १२ लाख ८४ हजार आणि खाजगी संस्थेकडून रु. १४ लाख म्हणजे टोटल खर्च रु. २७ लाख आहे. त्या ठेकेदाराने रु. १४ लाख प्रायोगिक तत्वावर बाहेरुन आणायचे आहेत.

**दिपक खांबित :-**

रु. १४ लाख नसून त्या ठेकेदाराचे रु. १४ लाख रु. मागितलेले होते. परंतु, प्रशासन रु. १० लाख करणार आणि ते सर्व काम खाजगीकरणातुन करणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

प्रशासन खाजगीकरणातुन म्हणजे कसा खर्च करणार? ते आम्हाला सांगा.

**दिपक खांबित :-**

खाजगी संस्थेला लिस्ट स्पॉन्सर करायची.

**केशव घरत :-**

माझा असा प्रश्न आहे की हा जो महापौर चषक आहे हा आपली जी क्रिडा समिती स्थापन झालेली आहे त्याच्यामार्फत होणार नाही का?

**दिपक खांबित :-**

तो वेगळा विषय आहे. मॅरेथॉन स्पर्धा आणि महापौर चषक हे दोन वेगळे विषय आहेत.

**रतन पाटील :-**

हे वेगळे आणि ते वेगळे आहे असे कसे?

**मोहन पाटील :-**

आपण यासाठीच रु. १० लाख घेतलेला आहे.

**मा. सभापती :-**

हा विषय सर्वानुमते मंजूर आहे.

**प्रकरण क्र. २३५ :-**

महापौर चषक मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करणे बाबत.

**ठराव क्र. २४३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत दि. २५ सप्टेंबर २००५ रोजी ''१ ली मिरा भाईंदर महापौर मिनिथॉन २००५'' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर स्पर्धेस मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद लाभलेला होता. सदर स्पर्धा ही सेवन स्टार्स स्पोर्ट्स अकॅडमी या संस्थेच्या सहकार्याने करण्यात आलेले होते.

सदर संस्थेने महानगरपालिकेस पत्र पाठवून रविवार दि. २०/०८/२३००६ रोजी ''२ री राज्यस्तरीय मिरा भाईंदर अर्ध मॅरेथॉन (Half Marathon) स्पर्धा २००६'' चे त्यांच्या सहकार्याने आयोजन करण्याबाबत कळविलेले आहे. सदर स्पर्धेकरीता होणारा खर्च हा रु. २७,२९,०००/- एवढा आहे. परंतु, त्यामधील रु. १४,४५,०००/- एवढा खर्च खाजगी प्रायोजक, खाजगी संस्था व देणगी दाराकडून करुन महानगरपालिकेच्या निधीतुन फक्त रु. १२,८४,०००/- एवढा खर्च करण्याची मागणी करण्यांत आली आहे. महानगरपालिकेमार्फत करावयाचा खर्च हा निविदा मागवून करावयाचा असुन अत्यावश्यक खर्चाकरीता अग्रीम घ्यावे लागणार आहे. सन २००६-०७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात ''शालेय क्रिडा स्पर्धा / सांस्कृतिक कार्यक्रम / मा. महापौर चषक / मॅरेथॉन स्पर्धा'' या लेखाशिर्षाखाली रु. ३५.०० लक्ष रक्कमेची तरतुद उपलब्ध आहे. प्रशासनाने दिलेला वरील गोषवारा पहाता सेव्हन स्टार्स स्पोटर्स अकॅडमी या संस्थेच्या सहकार्याने मिरा भाईंदर महापौर मिनिथॉन २००५ स्पर्धेचे आयोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर कामी महानगरपालिका निधीतुन फक्त रु. १५.०० लक्ष खर्च करण्यात यावा. उर्वरीत खर्च खाजगी प्रायोजकामार्फत करण्यात यावा. सदर कामी महानगरपालिकेमार्फत होणारा खर्च निविदा मागवुन व अग्रीम रक्कमेद्वारे करण्यात यावा.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. रमेश जैन.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सचिवांनी प्रकरण क्र. २३६ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

हा विषय मंजूर आहे.

**प्रकरण क्र. २३६ :-**

मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. महानगरपालिकेने स्वतंत्र Website तयार करणे.

**ठराव क्र. २४४ :-**

महानगरपालिकेचे स्वतःचे स्वतंत्र संकेतस्थळ नसल्याचे तसेच केंद्र शासनाचे माहितीचे अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती प्रसिध्द करणेकरिता Website तयार करणे आवश्यक असल्याने सदरची Website कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून तयार करुन घेणेस मा.आयुक्त सो. यांनी दि.११/११/२००५ रोजी मान्यता दिलेली असून त्यानुसार सदरबाबत कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकडून प्रस्ताव मागविण्यात आलेला आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने रु. ५,००,०००/- (रु.९६,०००/- लायसन्स फी सह) इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर केलेला असून त्यास मा. आयुक्त सो.यांनी दि.१६/०१/२००६ रोजी मंजुरी दिलेली आहे.

सदर प्रस्तावाचे अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सचिवांनी प्रकरण क्र. २३७ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

हा विषय मंजूर आहे.

**प्रकरण क्र. २३७ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)

**ठराव क्र. २४५ :-**

(१) **महानगरपालिका प्रभाग कार्यालये मुख्य कार्यालयाशी रेडीओ फ्रिक्वेंसीद्वारे कनेक्ट करणे (वाईड एरीया नेटवर्किंग)**

महानगरपालिकेने दिनांक ०५/०१/२००६ रोजी दैनिक गावकरी व दैनिक जन्मभुमी या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहीर निविदा सुचनेनुसार मिरारोड व भाईंदर (पूर्व) प्रभाग कार्यालये मुख्य कार्यालयाशी रेडीओ फ्रिक्वेन्सी (RF) द्वारे कनेक्ट करणे (Wide Area Networking) कामी खालील तीन ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या होत्या.

**1) Web-Surf Pvt. Ltd.**
**2) Brodlane Network Pvt. Ltd.**
**3) E Comm Opportunities Pvt. Ltd.**

वरील पैकी मे. वेब सर्फ  प्रा. लि. यांची निविदा सर्वात कमी दराची होती परंतु त्यातील दर जास्त वाटत असल्याने ठेकेदारास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता ठेकेदारांनी खालीलप्रमाणे दर कमी करण्यास संमती दर्शविली असून तसे लेखी पत्र दिले आहे. त्यानुसार खालील सुधारित दराचा तक्ता बनविण्यात आला आहे.

| **Sr. No.** | **Description** | **Qty.** | **Offer Rate in Tender** | | **Rate after Reduction** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **Rate** | **Amt.** | **Reduc. Amt.** | **Redused Rate** | **Total Amount** |
| 1 | 2888W Elite Connect Universal Wireless Bridge/AP/WDS Dualband operating Frequency 2.4/5.4Ghz. | 2 | 138422.21 | 276844.42 | 1384.22 | 137037.99 | 274075.98 |
| 2 | SMC ELite Lighting Protector Connect Wireless High Gain Antenna Acceccory | 2 | 9942.97 | 19885.94 | 99.43 | 9843.54 | 19687.08 |
| 3 | WPA-2410 2.4Ghz 100m W Power Amplifire | 2 | 69774.02 | 139548.04 | 697.74 | 69076.28 | 138152.56 |
| 4 | LMR 400 Low Loss RF Cables 20 Feet | 1 | | 11843.55 | 118.44 | 11725.11 | 11725.11 |
| 5 | Horizantal – 140 Sector Antenna with High Gain 19 dbi | 2 | 62123.52 | 124247.04 | 621.24 | 61502.28 | 123004.56 |
| 6 | 2586 Wireless Bridge Radio 802.11b/g 2.4Ghz | 2 | 47080 | 94160.00 | 470.8 | 46609.2 | 93218.40 |
| 7 | Water Proof Enclosure Box | 2 | 2648.25 | 5296.5 | 26.48 | 2621.77 | 5243.54 |
| 8 | 24dhi Parabolic Grid Antenna | 2 | 17655.00 | 35310.00 | 176.55 | 17478.45 | 34956.90 |
| 9 | LMR Low Loss RF Cables with N-type to SMA connector | 2 | 3574.54 | 7149.08 | 35.75 | 3538.79 | 7077.58 |
| 10 | Elevation Lamp | 2 | 3295.6 | 6591.20 | 32.96 | 3262.64 | 6525.28 |
| | | | | | | | |
| | Total Hardware Cost Including All Taxes | | | 720875.77 | | | 713666.91 |
| | Implementation & Configuration 10% Hardware Cost | | | 72087.57 | | | 71366.70 |
| | Service Tax 10.2% on Implementation & Configuration | | | 7352.93 | | | 7279.40 |
| A | Total Amount With Hardware and Implementation | | | 800316.27 | | | 792313.01 |
| | | | | | | | |
| B | Masting of Tower for H.Q and for Ward Office (1+2) | | | 69000.00 | 690.00 | | 68310.00 |
| | | | | | | | |
| C | Annual Maintance Contract | | | | | | |
| | Provuision of Amc at MBMC office<br>Person will handled following tasks<br>• Monitoring & Maintence of Wan Wireless connectivity<br>• Monitoring all System connectivity<br>• Local Troubleshooting | 1 Year | | 110000.00 | 1100.00 | 108900.00 | 108900.00 |
| | **Total Project Cost A+B+C** | | | **979316.27** | | | **969523.01** |

वरील सुधारीत दराच्या तक्त्या नुसार मे. वेब सर्फ प्रा. लि. यांची निविदा स्विकारण्यास मंजूरी दिलेली आहे.

**२) महानगरपालिका मुख्य कार्यालयाचे लोकल एरीया नेटवर्किंग (LAN) करणे.**

महानगरपालिकेने दिनांक ०५/०१/२००६ रोजी दैनिक गावकरी व दैनिक जन्मभुमी या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेल्या जाहीर निविदा सुचनेनुसार प्रभाग कार्यालये मुख्य कार्यालयातील संगणक लोकल एरिया नेटर्वकींग (LAN) द्वारे जोडणे करीता खालील तीन ठेकेदारांनी आपल्या निविदा मुदतीत सादर केल्या आहेत.

1) **Comptel Systems**
2) **Bell Computronics**
3) **Classic Enterprises**

वरील पैकी मे. कॉम्प्टेल सिस्टीम्स यांची निविदा सर्वात कमी दराची होती परंतु त्यातील दर जास्त वाटत असल्याने ठेकेदारास वाटाघाटीसाठी पाचारण केले असता ठेकेदारांनी खालीलप्रमाणे दर कमी करण्यास संमती दर्शविली असून तसे लेखी पत्र दिले आहे. त्यानुसार खालील सुधारित दराचा तक्ता बनविण्यात आला आहे.

| Sr. No. | Description | Qty. | Offer Rate in Tender | | Rate after Deduction | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | Unit Price | Total Amt. | Redu. Rate | Total Amt. |
| 1 | Cat 5E 100 MBS | 5000 mt. | 15.00 | 75,000.00 | 14.70 | 73,500.00 |
| 2 | Optical Fibar Cable with Termaintion at required ends | 200 mt. | 300.00 | 60,000.00 | 294.00 | 58,800.00 |
| 3 | 10/100 Manageable Switches 24 Port | 4 nos. | 30,000.00 | 120,000.00 | 27,600.00 | 110400.00 |
| 4 | RJ 45 | 96 nos. | 15.00 | 1440.00 | 14.70 | 1,411.20 |
| 5 | Single Phase surface mounted IO | 96 nos. | 350.00 | 33,600.00 | 343.00 | 32,928.00 |
| 6 | Connecting Cable Cat 5 with connectors patch cord | 96 nos. | 300.00 | 28,800.00 | 294.00 | 28,224.00 |
| 7 | Rack with power distribution box for twenty-four port four switches in rack with patch panel for cat 5E cable with cable manger | 5 nos. | 10,500.00 | 52,500.00 | 10,290.00 | 51,450.00 |
| | Schedule II Setting up users | | | | 0 | 0 |
| 1 | User Creation Instaulation & commissing | 96 users | 1,800.00 | 172,800.00 | 1660.00 | 1,59,360.00 |
| | | **Total** | | **544,140.00** | | **516,073.20** |

वरील सुधारीत दराच्या तक्त्या नुसार मे. कॉम्पटेल सिस्टीम्स यांची निविदा स्विकारण्यास मंजूरी दिलेली आहे.

सदर प्रस्तावाचे अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सचिवांनी प्रकरण क्र. २३८ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

हा विषय मंजूर आहे.

**प्रकरण क्र. २३८ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. २४६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे एकुण क्षेत्रफळ ७९ चौ.कि.मी. आहे. सन १९९१ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या १,७५,००० होती. सन २००१ च्या जनगणने नुसार ५,२०,००० एवढी झाली. ही बाब विचारात घेता महापालिकेच्या लोकसंख्येत १९६ टक्के वाढ झाली ही बाब विचारात घेता महापालिका हद्दीत चालू विकासाची कामे विचारात घेता महापालिका क्षेत्रात प्रति दिन माणसे ३५० ग्रॅम ते ४०० ग्रॅम घनकचरा निर्माण होतो. ही बाब विचारात घेता महापालिका क्षेत्रात जवळ जवळ २६० मेट्रीक टन घनकचरा निर्माण होतो.

महापालिका क्षेत्रात दैनंदिन निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर क्विक ॲरोबीक कंपोस्ट या नावाचे बायोकल्चर पावडर १३५०० किलो खरेदी करणेकामी निविदा मागविणेचे प्रस्तावास मा. आयुक्त सो. यांनी दि. २२/१२/२००५ रोजी मंजुरी दिली होती. दिलेल्या मंजुरीनुसार निविदा मागवून मे. ग्रीन गोल्ड एनर्जी यांची कमी दराची रु. ६०/- प्रती किलो दराची निविदा स्विकारुन ५००० किलो बायोकल्चर पुरवठा करणे बाबत मे. ग्रीन गोल्ड एनर्जी यांना जा.क्र. मनपा/आरोग्य/२८०/०५-०६, दि. ०५/०७/२००५ रोजी कार्यादेश देण्यात आला होता. दिलेल्या कार्यादेशानुसार मे. ग्रीन गोल्ड एनर्जी यांनी आरोगय विभागास ५००० किलो बायोकल्चर पुरवठा केले होते. त्याच मंजूर दरात मे. ग्रीन गोल्ड एनर्जी यांचेकडून रु. ६०/- प्रती किलो या मंजूर दरात

८००० किलो बायोकल्चर खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या रु. ४,८०,०००/- खर्चास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सचिवांनी प्रकरण क्र. २३९ चे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

हा विषय मंजूर आहे.

**मोहन पाटील :-**

प्रकरण क्र. २३६, प्रकरण क्र. २३७, प्रकरण क्र. २३८ आणि प्रकरण क्र. २३९ हे अवलोकनाचे विषय असल्यामुळे आम्ही त्या विषयावर चर्चा करायची नाही का?

**मा. सभापती :-**

परंतु, ही अवलोकनाची सर्व प्रकरणे मंजूर आहेत.

**प्रकरण क्र. २३९ :-**

मा. आयुक्त यांनी मंजूर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. २४७ :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रासाठी आवश्यक असणारी ॲन्टीरेबीज लस व प्रेगनन्सी कीट खरेदी करणे कामाच्या निविदा मागवणेत आल्या होत्या. त्यास प्रतिसाद मिळून मे. निरव ट्रेड लिंक, मे. अंबिका एंटरप्राइजेस, मे. हेल्थ केअर फार्मा या निविदाकारानी खालीलप्रमाणे दर सादर केले आहेत.

| साहित्याचे नांव | मे. निरव ट्रेड लिंक | मे. अंबिका एंटरप्राइजेस | मे. हेल्थ केअर फार्मा |
|---|---|---|---|
| ॲन्टीरेबीज लस | रु. ३३८/- प्रति १ एम.एल. | **रु. ३२५/- प्रति १ एम.एल.** | रु. ३३२/- प्रति १ एम.एल. |
| प्रेगनन्सी कीट | रु. ४७.५० प्रती स्ट्रीप | **रु. ३४/- प्रती स्ट्रीप** | रु. ४०/- प्रती स्ट्रीप |

वरीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता पाहता मे. अंबिका एंटरप्राइजेस यांनी ॲन्टीरेबीज लस व प्रेगनन्सी कीट खरेदी करणेकामी निविदेत सादर केलेले दर इतर दोन्ही निविदाकारांच्या तुलनेत सर्वात कमी असून कमी दरांची निविदा स्विकारण्यास व याकामी येणाऱ्या खर्चास तसेच आरोग्य केंद्रावर ॲन्टीरेबीज व प्रेगनन्सी कीट बाह्य रुग्णांना उपचार देणे कामी अनुक्रमे रु. ५०/- व रु. १०/- घेणेस मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर प्रस्तावाचे मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**दुःखवठा ठराव क्र. २४७(अ) :-**

कै. रामचंद्र पांडूरंग पाटील हे नवघर भाईंदरचे रहिवाशी असून स्वातंत्र्य सैनिक होते. तसेच खारीगावातील समाज कार्यकर्ते कै. अनंत विठ्ठल पाटील उर्फ राजा यांना आज देवाज्ञा झालेली आहे. त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती मिळावी व आपण सर्वजण त्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सहभागी होऊया.

**सुचक :- श्री मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. कैलासबेन जानीृ**
**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारी वर्ग आपण सर्वांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे हार्दिक आभार मानुन आजची सभा संपल्याचे मी जाहिर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.५५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**